दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १३५ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.१८ मार्च २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोणा (घोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

# विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी महायुतीचे उमेदवार जाहीर

## शिवसेनेकडून चंद्रकांत रघुवंशी, राष्ट्रवादी काँग्रेसकडून संजय खोडकेंना उमेदवारी; भाजपकडून ३ नेत्यांना संधी

**मुंबई (वृत्तसंस्था)**–विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी महायुतीचे उमेदवार जाहीर झाले आहेत. पाच पैकी तीन जागांसाठी भाजपने काल उमेदवार जाहीर केले होते. आज राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेने उमेदवार जाहीर केले आहेत. शिवसेनेने चंद्रकांत रघुवंशी आणि राष्ट्रवादी काँग्रेसने संजय खोडके यांच्या नावाची घोषणा केली.भाजपकडून संदीप जोशी, संजय केनेकर आणि दादाराव केचे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान, विधानपरिषदेच्या रिक्त जागांसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. उद्या (१८ मार्च) रोजी अर्जांची छाननी होईल. त्यानंतर २० मार्चपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. तर, मतदानाची तारीख २७ मार्च आहे. मात्र, पाचपेक्षा अधिक अर्ज आले नाहीत तर निवडणूक बिनविरोध होऊ शकते.

विधानपरिषदेच्या ५ जागांसाठी निवडणूक जाहीर झाली असली तरी विरोधी पक्षांनी मात्र उमेदवार दिलेला नाही. कारण विधानसभेत महाविकास आघाडीच्या घटकपक्षांच्या आमदारांची संख्या कमी आहे. त्यामुळे उमेदवार दिला तरी यश मिळणार नसल्याची खात्री असल्याने महाविकास आघाडीने या निवडणुकीसाठी उमेदवार जाहीर केलेला नाही.दरम्यान, शिवसेना शिंदे गट आणि अजित पवार गटाकजून अनेक जण या जागेसाठी इच्छुक होते. मात्र, शिवसेनेकडून चंद्रकांत रघुवंशी आणि अजित पवार गटाकडून संजय खोडके यांना संधी देण्यात आली आहे. चंद्रकांत सूर्यवंशी हे १९९२ पासून राजकारणात सक्रीय आहेत.महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यातील कामकाजाला आज सुरूवात झाली आहे. अजित पवार अर्थसंकल्पावर झालेल्या सर्वसाधारण चर्चेला आपले उत्तर देतील. त्यात ते विरोधकांनी केलेली टीका आपल्या युक्तिवादाने परतावून लावण्याचा प्रयत्न करतील. यावेळी ते भविष्यातील आपल्या योजनांवरही प्रकाश टाकण्याची शक्यता आहे.



## सेवानिवृत्त पोलिसाचा सहभाग उघड

# दौंडच्या गोपाळवाडीत बेकायदेशीर दारू अड्ड्यावर पोलिसांची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील गोपाळवाडी (सरपंचवस्ती) येथे बेकायदेशीर देशी-विदेशी दारू विक्रीच्या अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकून मोठी कारवाई केली. विशेष म्हणजे, या प्रकरणात एका सेवानिवृत्त पोलिसाचा सहभाग असल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलीस उपनिरीक्षक युवराज घोडके यांना सरपंचवस्ती परिसरात अवैधरीत्या दारू विक्री होत असल्याची माहिती मिळाली. त्यांनी ही माहिती पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांना कळवली. तत्काळ कारवाईचे आदेश देण्यात आले आणि घोडके यांच्या नेतृत्वाखालील पथकाने छापा टाकला.कारवाईदरम्यान, शिवाजी संभाजी जाधव (रा. सरपंचवस्ती, दौंड) हा देशी-विदेशी दारूचा बेकायदेशीर व्यवसाय करत असल्याचे आढळून आले. विशेष म्हणजे,




जाधव हा सेवानिवृत्त पोलीस कर्मचारी असून, सेवेतून निवृत्त झाल्यानंतर अवैध धंद्यात गुंतला होता.या छाप्यात पोलिसांनी १५,००० रुपये किमतीच्या दारूच्या बाटल्या आणि रोख रक्कम जप्त केली. आरोपीवर संबंधित कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

याच दरम्यान, गांधी चौक आणि इंदिरानगर झोपडपट्टी परिसरातील पत्त्याच्या क्लबवरही पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत पत्त्याचा क्लब चालवणाऱ्या व्यक्तीसह जुगार खेळणाऱ्यांवरही गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी स्पष्ट केले की, दौंड शहर व परिसरात बेकायदेशीर धंदे, मटका-जुगार चालवणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. पोलिसांनी साध्या वेशात गस्त घालणाऱ्या पथकांची नेमणूक केली असून, हे पथक अवैध धंद्यांवर बारकाईने लक्ष ठेवणार आहे.याशिवाय, शाळकरी विद्यार्थ्यांची छेड काढणाऱ्या, महिलांना त्रास देणाऱ्या तरुणांवरही पोलिसांनी करडी नजर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.या कारवाईमुळे दौंड तालुक्यात बेकायदेशीर धंदे करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्याच्या सहभागाने हा मुद्दा अधिक गंभीर बनला आहे. पुढील काळात पोलीस प्रशासन अशा गुन्ह्यांवर कठोर कारवाई करणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत.

# औरंगजेबाच्या कबरीचा वाद; नागपूरमध्ये दगडफेक-जाळपोळ,गाड्यांची तोडफोड

**नागपूर । प्रतिनिधी**

औरंगजेबाच्या कबरीवरून अवघ्या महाराष्ट्राचे वातावरण तापले असताना नागपूर शहरातील महाल परिसरात रात्री ८ च्या सुमारास मोठा राडा झाला. त्यात दोन विशिष्ट समुदायाकडून एकमेकांवर दगडफेक करण्यात आली आहे. तसेच गाड्यांचीही जाळपोळ करण्यात आली आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झालेत. त्यांनी अश्रुधुराच्या नळकांड्या फोडून स्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला. पण जमावाने पोलिसांवरच दगडफेक करत त्यांच्या गाड्या पेटवून दिल्यात. यामुळे नागपुरात सध्या तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी जादा कुमक मागवली आहे.उपद्रव माजवणाऱ्या लोकांना रोखण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्याही फोडल्या. डीसीपी निकेतन कदम यांच्यावर कुऱ्हाडीने हल्ला करण्यात



आला. या घटनेत अनेक लोक जखमी झाले आहेत. पोलिसांनी २० हून अधिक जणांना ताब्यात घेतले आहे.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, हा हल्ला नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आला होता. पोलिस पथकावर दगडफेक करण्यात आली आहे. असे कृत्य करणाऱ्यांना सोडले जाणार नाही. औरंगजेब हा देशाचा शत्रू आहे. त्याच्या समर्थकांवर कडक कारवाई केली जाईल.

# 'बरे झाले पक्ष फुटला':अशा व्यक्तीसोबत काम करू शकत नाही-सुप्रिया सुळे

## मुंडेंनंतर आणखी एक विकेट जाणार असल्याचा दावा

**मुंबई (वृत्तसंस्था)**–बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करणारा आकाचा आका हा एकच व्यक्ती आहे. हाच व्यक्ती संतोष देशमुख यांची हत्या होत असताना फोनवरून विकृतपणे या सगळ्याची मजा घेत होता, असा गौप्यस्फोट राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला आहे. पक्षाच्या रविवारी पार पडलेल्या बैठकीत बोलताना सुळे यांनी हा आरोप केला असल्याचा दावा केला जात आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणासह मंत्र्यांच्या भ्रष्टाचार प्रकरणात सुप्रिया सुळे यांनी राज्य सरकारला घेण्याचा प्रयत्न केला. यात त्यांनी धनंजय मुंडे यांच्याप्रमाणे लवकरच आणखी एकाची विकेट जाणार असल्याचा दावा देखील केला आहे. मात्र, त्या व्यक्तीचे नाव सांगण्यास त्यांनी नकार दिला. त्यामुळे ती व्यक्ती कोण? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



तर दुसरीकडे आवादा कंपनी विरोधात केंद्र सरकारला पत्र पाठवणारी आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणात व्हिडिओ पाहणारी ती व्यक्ती कोण? असा प्रश्नही उपस्थित होत आहे.या संबंधात मला मिळालेल्या माहितीनुसार सरपंच संतोष देशमुख यांना मारहाण होत असताना तिकडे एका व्यक्तीने फोन केला होता. ही व्यक्ती त्याची गंमत पाहत होती. हे किती विकृती आहे? असा सवाल खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला. ही व्यक्ती खंडणी, सत्ता आणि पैशाच्या जीवावर हे सगळे करत होती. इतकेच नाही तर आवादा कंपनीच्या विरोधात केंद्र सरकारला तीन पत्रे पाठवली होती, असा दावा त्यांनी केला आहे. यामध्ये आवादा कंपनी ही वाईट आहे, त्यांच्याकडे चांगले काम होत नाही. त्यांना बीड मधून बाहेर काढून टाका, असा उल्लेख या पत्रात केला होता. तर दुसरीकडे कंपनीवर आरोप करणारा तोच व्यक्ती दुसरीकडे त्यांना खंडणी मागायचा. असे प्रकार होत असल्याचा आरोप देखील सुळे यांनी केला आहे.संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांची नुकतीच विकेट गेली आहे. मात्र, मंत्रिमंडळातील आणखी एका नेत्याची विकेट जाणार असल्याचा दावा सुप्रिया सुळे यांनी केला आहे. आणखी सहा महिने थांबा, आणखी एका व्यक्तीची विकेट जाणार आहे. हा व्यक्ती बायकोच्या आड सर्व उद्योग करत असल्याचा आरोप त्यांनी केला. त्याच्यामध्ये हिंमत असेल तर त्यांनी समोर येऊन लढावे, असे आव्हान देखील सुप्रिया सुळे यांनी दिले आहे. त्यामुळे आता तो मंत्री कोण? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.धनंजय मुंडे यांच्या विरोधात ते आमच्यासोबत पक्षात असताना देखील लढाई सुरू होती, असा दावा सुळे यांनी केला आहे. मात्र बरे झाले पक्ष फुटला. बायकोच्या गाडीमध्ये बंदूक ठेवणाऱ्या व्यक्तीसोबत मी काम करू शकले नसते, अशा शब्दात सुळे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर टीका केली आहे. जो व्यक्ती स्वतःची पत्नी, मुलांची आई असलेल्या महिलेच्या गाडीत बंदूक ठेवू शकतो, अशा पुरुषासोबत मी काम करू शकत नाही. मी याबाबत आज पहिल्यांदा बोलत असल्याचे सुळे यांनी म्हटले आहे. मी विरोधी पक्षात आयुष्य काढेल. मात्र नैतिकता तोडणार नाही. माझे घर कंत्राटदारांच्या पैशावर चालत नसल्याचे सुळे यांनी म्हटले आहे.

# पाचही युवकांचा अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

## या दुर्घटनेने चार कुटुंबांचा आधार हिरावला





**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील शंकरपूरपासून चार किमी अंतरावर असलेल्या कोलारी गावातील पाच युवकांचा घोडाझरी तलावात जलतरण करताना मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण तालुका हादरला असून १६ मार्च रोजी दुपारी एक वाजता अत्यंत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

या अंत्यसंस्काराला परिसरातील हजारो नागरिक हळहळ व्यक्त करत उपस्थित होते. तसेच, विरोधी पक्षनेते विजयभाऊ वडेट्टीवार यांच्यासह सर्व राजकीय पक्षांचे नेतेही उपस्थित होते. गावातील महिला आणि ग्रामस्थांनी या युवकांबद्दल दुःख व्यक्त केले. या प्रसंगाने कठोर मनाचा व्यक्तीही अश्रू अनावर होऊन भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.या पाचही युवकांची प्रेतयात्रा एकाच वेळी आणि एकाच मार्गावरून काढण्यात आली. गावातील स्मशानभूमीत चार चितांवर एकाच वेळी पाच मृतदेहांची अंत्यसंस्कार विधी पार पडली.त्यातील जनक किशोर गावंडे आणि यश किशोर गावंडे या सख्या भावांना एकत्र अग्नी देण्यात आला. चार अंत्यसंस्कारांमध्ये पाच मृतदेह एकत्र जळताना नातेवाईकांसह हजारो उपस्थितांचे हृदय हेलावून गेले.

### या दुर्घटनेने चार कुटुंबांचा आधार हिरावला

- तेजस बालाजी गावंडे – तो एकुलता एक मुलगा होता, त्याला विवाहित बहीण आहे. तो शेती करत होता. त्याच्या निधनामुळे संपूर्ण कुटुंब दुःखात बुडाले आहे.
- तेजस संजय ठाकरे – आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा. तो बारावीला भिवापूर येथे शिकत होता. त्याच्या निधनामुळे कुटुंबाचा वंशाचा दिवा मालवला.
- अनिकेत वामन गावंडे – त्याला मोठा भाऊ आहे, पण तो बुट्टीबोरी येथे खाजगी कंपनीत काम करत होता. त्यामुळे कुटुंबावर मोठा आघात झाला.
- जनक किशोर गावंडे व यश किशोर गावंडे – हे दोघेही सख्या भाऊ मृत्युमुखी पडल्याने त्यांचे कुटुंब उघडे पडले आहे. जनक सनफ्लेक्स कंपनीत अभियंता होता, तर यश बी.ई.च्या तिसऱ्या वर्षाला होता. या कुटुंबात पती-पत्नी व्यतिरिक्त कोणीही उरले नाही, त्यामुळे हा मोठा आघात मानला जात आहे.

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी चार लाखांची मदत जाहीर

या अंत्यसंस्काराला आमदार बंटी भांगडिया उपस्थित होते. त्यांनी ही दुर्घटना मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्येकी चार लाख रुपयांची मदत जाहीर करून शोकसंवेदना व्यक्त केल्या.

### विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी या घटनेचा मुद्दा विधानसभेत उपस्थित केला.

घोडाझरी तलावातील पाणीपुरवठा योजनेच्या कंत्राटदाराने वीस फूट खोल खड्डे केले, त्यामुळे गेल्या दोन-तीन वर्षांत १५ जणांनी जीव गमावला आहे.लोकप्रतिनिधींनी अनेकदा तक्रार करूनही हे खड्डे बुजवण्यात आले नाहीत.विधानसभेत हा विषय उपस्थित होताच, अध्यक्षांनी सरकारला तातडीने खड्डा बुजवण्याचे आणि संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याचे आदेश दिले.

# तमाशा कलावंतांसाठी सांस्कृतिक मंत्र्यांना भेटणार-खासदार नीलेश लंके यांची माहिती

**अहिल्यानगर । सुयश नरसाळे**

महाराष्ट्रातील तमाशा कलावंतांच्या केंद्रीय सांस्कृतिक मंत्र्यांच्या आखत्यारीतील काही मागण्या असून त्यासंदर्भात खा. शरद पवार यांच्या माध्यमातून आपणासह शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे केंद्रीय सांस्कृतीक मंत्र्यांची भेट घेऊन या मागण्यांची तड लावणार असल्याचे खा. नीलेश लंके यांनी सांगितले.

नीलेश लंके प्रतिष्ठानच्या माध्यमातून गड, किल्ले संवर्धन मोहिम हाती घेण्यात आली असून या मोहिमेचा शुभारंभ रविवारी किल्ले शिवनेरी येथे झाला. या मोहिमेवरून परतताना खा. लंके यांनी नारायणगांव येथील तमाशा पंढरीस भेट देऊन तेथील कलाकरांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना खा लंके म्हणाले, केंद्रीय सांस्कृतिक मंत्र्यांकडे कलावंतांच्या काही मागण्या आहेत. तमाशा कलावंतांना पॅकेज मिळाले पाहिजे ही एक मागणी आहे. सध्या दिल्लीत अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू आहे. या विभागाचे खासदार डॉ. अमोल कोल्हे व मी शरद पवार यांच्या माध्यमातून केंद्रीय सांस्कृतीक मंत्र्यांसमवेत लवकरात लवकर बैठक घेणार आहोत. त्यासाठी तमाशा कलावंतांच्या शिष्टमंडळालाही बोलविण्यात येणार असल्याचे खा. लंके यांनी सांगितले. तमाशा ही लोककला लोप पावत चालली आहे. ही पारंपारिक लोककला जिवंत राहिली पाहीजे असे माझ्यासारख्या कार्यकर्त्याचे मत आहे. तमाशा कलावंत आणि माझं आपुलकीचं नाते असल्याचे खा. नीलेश लंके यांनी सांगितले. ज्यावेळी कोव्हीडची महामारी आली, त्यावेळी याच तमाशा कलावंतांनी आमच्या भाळवणी येथील शरदचंद्र पवार आरोग्य मंदिरात मनोरंजनाचे कार्यक्रम घेऊन अनेक रूग्णांना कोरोनातून बाहेर काढले. तमाशा कलावंतांच्या व्यथा, अडीअडचणी मला माहीती असल्याचे खा. लंके यांनी सांगितले. तमाशा कलावंतांच्या वाहनांकडून टोल आकारला जाऊ नये ही छोटीशी मागणी आहे. ज्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या वाहनांसाठी आपण आग्रही असतो तशीच भूमिका तमाशा कलावंतांसाठीही असल्याचे खा. लंके यांनी स्पष्ट केले. कलावंतांना कसा न्याय देता येईल यासाठी आपण आग्रही आहोत. कलावंतांचे मानधही मिळत नाही. कलाकाराचे ठराविक वय असते. त्या वयापलीकडे गेल्यानंतर या कलाकारांवर कधी-कधी उपासमारीची वेळ येते. ठराविक वयात कलाकाराला जो मान-सन्मान मिळतो तो त्याला आयुष्यभर मिळाला पाहिजे. त्यासाठी खास उपाययोजना झाली पाहिजे ही माझी भूमिका आहे. कलाकारांना गेल्या सहा महिन्यांपासून मानधन मिळत नाही. मागील आठवडयात कलावंतांच्या मानधनाबाबत आपण संबंधित मंत्र्यांना पत्र दिले आहे. या प्रश्नाकडे लक्ष देण्यासाठी सरकारकडे वेळ नाही. खा. नीलेश लंके यांनी कोरोना बाधित रूग्णांसाठी शरदचंद्र पवार आरोग्य मंदिर सुरू केले होते. या आरोग्य मंदिराचा देशात नव्हे तर जगात बोलबाला झाला. हे आरोग्य मंदिर पाहण्यासाठी आम्ही गेलो असता तिथे खा. नीलेश लंके हे मोकळेपणाने फिरून कोरोना रूग्णांना धीर देत होते. आमच्यासोबतच्या तमाशा कलावंतांनी रूग्णांसाठी कला सादर केली. कार्यक्रमानंतर प्रत्येक कलाकाराला खा. लंके यांनी महिनाभर पुरेल इतके धान्य दिले. यावरून खा. लंके यांना तमाशा कलावंतांविषयी किती आस्था आहे याची कल्पना येते.



# हिंगणघाट तहसीलदार यांना बजरंग दलाचं निवेदन

## औरंगजेबाच्या कबरेच्या विरोधात कारवाईची मागणी



**हिंगणघाट । प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषद व बजरंग दल हिंगणघाट यांच्या वतीने तहसीलदार हिंगणघाट यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात औरंगजेब या हिंदू द्वेष्ट्याच्या कबरेला महाराष्ट्र शासनाने तात्काळ हटवावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच हे हिंदुत्ववादी सरकार असल्याचे सिद्ध करावे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, औरंगजेबच्या काळात हिंदूंवर अमानुष अत्याचार करण्यात आले होते. अशा व्यक्तीची कबर महाराष्ट्रात असू नये. अन्यथा बजरंग दल आपल्या पद्धतीने कारसेवा करून ती कबर हटवेल, असा इशाराही या आंदोलनात्मक निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला आहे.या वेळी बजरंग दलाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोहा येथे विश्व हिंदू परिषद-बजरंग दल औरंगजेबच्या कबरीविरोधात आक्रमक

**रायगड । प्रतिनिधी**

क्रूरकर्मा औरंगजेब याचे कुठलेही स्मारक किंवा कबर स्वतंत्र भारतात असू नये, अशी मागणी विश्व हिंदू परिषद आणि बजरंग  कार्यकर्त्यांनी रोहा पोलीस स्टेशन आणि प्रांत कार्यालय रोहा येथे निवेदनाद्वारे केली.१७ मार्च २०२५ रोजी दिलेल्या निवेदनात, मागणी मान्य न झाल्यास हिंदू समाजाच्या सोबत छत्रपती संभाजीनगर येथे कारसेवा करून औरंगजेबाची कबर उध्वस्त करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



हे निवेदन बजरंग दलाचे रोहा संयोजक किरण प्रशांत कानडे, दुर्गावाहिनी प्रमुख सौ. स्वरांजली निलेश शिर्के, मातृशक्ती प्रमुख सौ. अलका गोविंदजी डाके, भारतीय मजदूर संघाचे अशोकजी निकम, धर्मरक्षक हिंदू सेनेचे तेजसजी देशमुख, तसेच देवेंद्र जुईकर, अमित धाटावकर, भरत ठाकरे आणि इतर कार्यकर्त्यांनी सादर केले.या मागणीस हिंदू समाजात मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळत असल्याचे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे

# जय बजरंग रोहाच्या राज मोरे याची रायगड जिल्हा कबड्डी संघात निवड!

**रायगड । प्रतिनिधी**

जय बजरंग रोहा कबड्डी संघाचा अष्टपैलू खेळाडू राज मोरे याची ७२ व्या महाराष्ट्र राज्य प्रौढ गट पुरुष राज्य अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी रायगड जिल्हा कबड्डी संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा १९ ते २३ मार्च २०२५ रोजी ठाणे येथे होणार आहे.

या स्पर्धेसाठी अलिबाग येथे १० दिवसांचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते.

राज मोरे याची याच वर्षी महाराष्ट्र राज्य कुमार गट कबड्डी संघातही निवड झाली होती, तसेच तो रायगड कुमार गट संघाचा कर्णधारही होता. जय बजरंग रोहा कुमार गट संघ या वर्षी अंतिम विजेता ठरला असून, राज मोरेच्या मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्याला हे यश मिळाले आहे. राज मोरे जय बजरंग रोहा संघातून रायगड प्रौढ गटात निवड झालेला आतापर्यंतचा दुसरा खेळाडू आहे. राजच्या




निवडीमुळे त्याच्या रोठ गावात आनंदाचे वातावरण आहे. गावकऱ्यांना त्याचा अभिमान वाटत असून, सर्वच स्तरांतून त्याचे अभिनंदन होत आहे. जय बजरंग क्रीडा मंडळाचे अध्यक्ष अमर सलागरे यांनी राज मोरेच्या यशाबद्दल त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# दलित महिला शेतकरी आणि पत्रकाराच्या दुकानावर हल्ला; निषेधार्थ धरणे आंदोलन

**शिरूर । प्रतिनिधी**

दौंड तालुक्यातील पाटस येथे दलित महिला शेतकरी आणि पत्रकाराच्या दुकानावर हल्ला झाल्याच्या घटना घडल्या आहेत. यवत पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले असले तरी मुख्य आरोपींवर अद्याप कारवाई न झाल्याने १७ मार्चपासून पाटस पोलीस चौकीसमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

शेतकरी महिला कल्पना अरुण पानसरे या शेतात काम करत असताना गाव तंटामुक्ती समितीच्या अध्यक्षाच्या मुलासह काही जणांनी बाहेरून गुंड बोलावून शेतात घुसखोरी केली. पिस्तूलचा धाक दाखवत मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. यवत पोलीस ठाण्यात १६ जणांविरोधात अॅट्रॉसिटीसह गुन्हा दाखल झाला आहे, मात्र मुख्य आरोपी फरार आहेत.

दुसऱ्या घटनेत पत्रकार राजेंद्र झेंडे यांच्या लोखंडी पत्र्याच्या दुकानावर १२ फेब्रुवारी रोजी सरपंच, तिचे पती आणि २०-२५ जणांच्या जमावाने तोडफोड केली. दुकानातील साहित्य आणि रोख रक्कम लुटली गेली असून, या प्रकरणी अद्याप गुन्हा दाखल झालेला नाही.या दोन्ही घटनांमागे स्थानिक राजकीय दबाव असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे पीडित पानसरे आणि झेंडे कुटुंबीयांनी न्याय मिळण्यासाठी १७ मार्चपासून पाटस पोलीस चौकीसमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.यवत पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांनी सांगितले की, शेतकरी महिलेवरील अॅट्रॉसिटीचा गुन्हा दौंडचे उपविभागीय अधिकारी तपासत आहेत, तर पत्र्याच्या दुकानावरील कारवाई अतिक्रमण म्हणून झाल्याचे सांगण्यात येत आहे.या घटनांमुळे पाटस आणि दौंड तालुक्यात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, सामाजिक संघटनांनी या घटनेचा निषेध नोंदवला आहे.

# ग्रामीण भागातील युवकाची तुर्कीमध्ये गगनभरारी!



**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील शिऊर गावातील अक्षय सूर्यवंशी याने तुर्कीतील इस्तंबूल येथे झर्शीळिले कंपनीत नोकरी मिळवत मोठे यश संपादन केले आहे.अक्षय सूर्यवंशी यांनी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण शिऊर येथे पूर्ण केले. त्यानंतर वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ, परभणी येथे फूड टेक्नॉलॉजी विषयात पदवी घेतली. पदवी परीक्षेत उत्तम टक्केवारी मिळाल्याने त्यांना झर्शीळिले कंपनीत चांगली संधी मिळाली.घरची परिस्थिती नाजूक असल्यामुळे या यशाने कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. अक्षय यांनी त्यांच्या यशाचे श्रेय वडील विलास सूर्यवंशी, संजय सूर्यवंशी, कैलास सूर्यवंशी आणि विशाल सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाला दिले.

# दिव्यांग नागरिकांना हक्काचा अर्थसहाय्य निधी वाटप करा छोटूभाई शेख यांची मागणी



**वरोरा । प्रतिनिधी**

शासनाच्या नियमानुसार नगरपालिकेच्या बजेटमध्ये ५ टक्के निधी दिव्यांग बांधवांसाठी राखीव असतो आणि दरवर्षी मार्च महिन्याच्या सुरुवातीला तो त्यांच्या बँक खात्यात जमा केला जातो. मात्र, मार्च महिना संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक असतानाही अद्याप हा निधी वितरीत न झाल्याने छोटूभाई शेख यांनी दिव्यांग लाभार्थ्यांसाठी निधी त्वरित वितरित करण्याची मागणी केली.

तीन दिवसांपूर्वी छोटूभाई शेख यांनी यासंदर्भात लेखी निवेदन सादर केले होते. त्यानंतर १७ मार्च २०२५ रोजी वरोरा नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विशाखा शेळके यांच्या कक्षात दिव्यांग पुरुष आणि महिला लाभार्थ्यांसह बैठक घेण्यात आली.मुख्याधिकारी विशाखा शेळके यांनी प्रकरणाची गांभीर्याने दखल घेत तातडीने निधी वितरीत करण्याचे मान्य केले. यानुसार जवळपास ३०० दिव्यांग पुरुष आणि महिला लाभार्थ्यांच्या बँक खात्यात दोन दिवसांत अर्थसहाय्य निधी जमा करण्यात येणार आहे.

यासोबतच वरिष्ठ लिपिक घनश्याम तिवारी यांनीही निधी लवकरात लवकर वितरीत केला जाईल, असे आश्वासन दिले. या निर्णयामुळे दिव्यांग लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त करत मुख्याधिकारी, छोटूभाई शेख आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे आभार मानले.या बैठकीस सामाजिक कार्यकर्ते आणि जयहिंद सैनिक संस्थेचे राजेंद्र मर्दाने, बाळासाहेब जिवने, अशोक बावणे, यादवजी घ्यार यांसह मोठ्या संख्येने दिव्यांग पुरुष व महिला उपस्थित होते.

### तालुक्यातील इतर गावांतील दिव्यांगांसाठीही निधीची मागणी

**तालुक्यातील सर्व गावांमध्ये दिव्यांग लाभार्थ्यांना ग्रामपंचायतीतून अर्थसहाय्य मिळावे यासाठी वरोरा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना निवेदन पाठवण्यात आले आहे.**

### निरंतर प्रयत्न करण्याचे आश्वासन

**केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ सर्व दिव्यांग लाभार्थ्यांना मिळावा यासाठी मी सतत प्रयत्न करत राहीन, असे छोटूभाई शेख यांनी सांगितले.**

# व्यापारी आणि प्रशासनाच्या मनमानीविरोधात शेतकऱ्यांचा संघर्ष-कृषी उत्पन्न बाजार समिती सचिवांना चणा भेट

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकऱ्यांना हमीभावाने चणा विक्री करता येत नसल्याने सरकार आणि कृषी उत्पन्न बाजार समितीच्या भूमिकेचा निषेध करत शेतकऱ्यांनी सचिव चंद्रसेन शिंदे यांच्यामार्फत सरकारला चणा भेट दिला .

शासनाच्या नियमानुसार व्यापाऱ्यांनी हमीभावाने उच्च दर्जाचा शेतमाल खरेदी करून २४ तासांत पैसे अदा करणे बंधनकारक आहे. मात्र, वरोरा कृषी उत्पन्न बाजार समितीत व्यापारी हमीभावापेक्षा कमी दराने शेतमाल घेत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. मागील अनेक वर्षांपासून नाफेडमार्फत चण्याची खरेदी होत होती, मात्र यंदा अद्याप नोंदणीही सुरू झालेली नाही. यामुळे हजारो क्विंटल चणा हमीभावाने विक्री करता येत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या परिस्थितीचा निषेध करण्यासाठी शेतकरी नेते किशोर डुकरे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयात जाऊन सचिवांना चणा भेट दिला. या आंदोलनात शेतकरी नेते किशोर डुकरे, तुलसी आलम, तुकाराम निब्रड, सुनील निब्रड, पुष्पाकर खेवले, महेश वराडकर, लक्ष्मण आसुटकर, पुरुषोत्तम झाडे, संदीप वासेकर, प्रतीक डुकरे आदी शेतकरी सहभागी झाले होते.हमीभावाने शेतमाल खरेदी करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.



# ५० हजारांची लाच स्वीकारताना शबरी विकास महामंडळाचा लेखापाल एसीबीच्या जाळ्यात

**गडचिरोली । प्रतिनिधी**

बेरोजगार युवकास वाहन खरेदी करण्यासाठी कर्ज मंजूर करण्यासाठी त्याच्याकडून ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज गडचिरोली येथील शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या कंत्राटी लेखापालस रंगेहाथ पकडून अटक केली. रुपेश वसंत बारापात्रे (४०) असे आरोपी लेखापालाचे नाव आहे.एसीबीने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारकर्ता युवक हा देसाईगंज तालुक्यातील कोरेगाव येथील रहिवासी असून, त्याला माल वाहतुकीकरिता वाहन खरेदी करावयाचे होते. त्यासाठी त्याने गडचिरोली येथील शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडे अर्ज केला. त्याअनुषंगाने तक्रारकर्त्यास १० लाख रुपयांचे कर्ज मंजूर करण्याकरिता कार्यकारी लेखापाल रुपेश बारापात्रे याने शाखा व्यवस्थापक हर्षल बोरोले यांच्या नावाने १२ मार्चला ५० हजार रुपयांची मागणी केली. परंतु लाच देण्याची मूळीच इच्छा नसल्याने तक्रारकर्त्याने एसीबीकडे तक्रार केली. त्यानंतर एसीबीच्या अधिकाऱ्यांनी पडताळणी केली असता रुपेश बारापात्रे याने लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार आज एसीबीच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून तक्रारकर्त्याकडून ५० हजार रुपयांची लाच स्वीकारताना रुपेश बारापात्रे यास रंगेहाथ पकडून अटक केली.




लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उपअधीक्षक चंद्रशेखर ढोले यांच्या पर्यवेक्षणात पोलिस निरीक्षक संतोष पाटील, शिवाजी राठोड, सहायक फौजदार सुनील पेद्दीवार, हवालदार किशोर जौंजाळकर, राजेश पद्मगिरवार, पोलिस नाईक स्वप्नील बांबोळे, संदीप घोरमोडे, संदीप उडाण, हितेश जेट्टीवार, विद्या म्हशाखेत्री, ज्योत्स्ना वसाके, राजेश्वर कुमरे यांनी ही कारवाई केली.

# भिवंडीत छत्रपती शिवाजी महाराजांचे पहिले मंदिर!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा

**ठाणे । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भिवंडी तालुक्यातील शिवक्षेत्र मराडेपाडा येथे उभारण्यात आलेल्या 'श्री छत्रपती शिवाजी महाराज शक्तिपीठ' मंदिराचे लोकार्पण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले.मंदिरातील शिवछत्रपतींच्या मूर्ती चरणी नतमस्तक होऊन मुख्यमंत्र्यांनी स्फूर्ती घेतली आणि सोहळ्याला संबोधित केले. यावेळी त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, महिमामंडन होणारच असेल, तर ते छत्रपती शिवरायांचेच! औरंगजेबाच्या पाशवी विचारांचे उदात्तीकरण करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

मुख्यमंत्र्यांनी या भव्य स्फूर्तीस्थळाच्या निर्मितीबद्दल शिवक्रांती प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. राजू चौधरी आणि मार्गदर्शक कैलास महाराज निचिते यांचे विशेष आभार मानले. तसेच, मराडेपाडा येथील या मंदिराची निर्मिती हे सर्वसामान्य कुटुंबातील मुलांनी काय करू शकतात याचे उत्तम उदाहरण आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन करत त्यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.मराडेपाडा येथील छत्रपती शिवरायांचे मंदिर हे तीर्थस्थळ व पर्यटनस्थळ म्हणून घोषित करावे, अशी मागणी आमदार किसन कथोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली.तसेच, राज्यभरातून आणि देशभरातून येणाऱ्या भाविकांसाठी यात्रिनिवासाची आवश्यकता आहे. गाव अगदी लहान असल्याने बाहेरून येणाऱ्या यात्रेकरूंसाठी राहण्याची व्यवस्था करणे कठीण होईल. प्रतिष्ठानने यासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे यात्रिनिवास आणि योग्य रस्ते जाळ्याच्या विकासासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी यावेळी करण्यात आली.मराडेपाडा येथील शिवरायांचे मंदिर महाराष्ट्रासह संपूर्ण देशभर चर्चेचा विषय ठरले आहे. एका छोट्या गावात एवढे भव्य आणि स्फूर्तीदायी मंदिर उभारले जाणे अभिमानास्पद असून, हे स्फूर्तीस्थळ भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.याप्रसंगी परमपूज्य स्वामी गोविंद देवगिरी महाराज, श्रीक्षेत्र तुंगारेश्वरचे परमपूज्य बालयोगी सदानंद महाराज, राष्ट्रसंत नीलकंठ शिवाचार्य महाराज, परमपूज्य अलोखनाथ महाराज, भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश (बाळ्यामामा) म्हात्रे, आमदार किसन कथोरे, माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, आमदार निरंजन डावखरे, आमदार महेश चौगुले, आमदार दौलत दरोडा तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.



## शिवसेना (शिंदे गट) तर्फे छत्रपती शिवरायांना मानवंदना व फळ वाटप



**भद्रावती । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, आदर्श शासनकर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवसेना (शिंदे गट) भद्रावतीच्या वतीने अभिवादन करून त्यांना मानवंदना देण्यात आली. यानंतर सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून स्थानिक ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाप्रमुख नितीन मत्ते व शिवसैनिक सुरज शाहा उपस्थित होते. तसेच शिवसेना (शिंदे गट) पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या उपक्रमाद्वारे शिवसेना (शिंदे गट) ने महाराजांच्या विचारांना अनुसरून समाजसेवा आणि गरजूंना मदतीचा हात देण्याचा संदेश दिला. यावेळी उपस्थितांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आदर्शांना आपल्या जीवनात अंगीकारण्याचा संकल्प केला. यावेळी शहर प्रमुख पप्पू सारवण, शिवसैनिक सुरज शाहा, उपतालुका प्रमुख सुंदर सिंह, शिवसैनिक सुमित हस्तक, उपशहर प्रमुख मनीष बुच्चे, उपतालुकाप्रमुख सिंगलदीप पेंदाम, आकाश वानखेडे, व इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## निप्पान प्रकल्पग्रस्तांचा विशाल मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला

### तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन सादर

**भद्रावती । प्रतिनिधी**

प्रकल्पग्रस्तांना प्रती एकर दहा लाख रुपये अनुदान द्यावे, अडीच एकरामागे एक नोकरी द्यावी व एमआयडीसी, प्रकल्पग्रस्त आणि कंपनीमध्ये त्रिपक्षीय लेखी करार करण्यात यावा या प्रमुख मागण्यांना घेऊन अन्य मागण्यांसाठी निप्पान प्रकल्पग्रस्तांनी काढलेला विशाल मोर्चा काल दिनांक १७ ला भद्रावती तहसील कार्यालयावर धडकला. त्यानंतर प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीतर्फे आपल्या विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदारांमार्फत शासनाला सादर करण्यात आले. यावेळी प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिनिधींनी तहसीलदारांसोबत आपल्या विविध मागण्यांवर चर्चा केली. निप्पान प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीतर्फे शहरातील



भद्रनाग मंदिर प्रांगणातून प्रकल्पग्रस्तांच्या विशाल मोर्चाला सुरुवात करण्यात आली. सदर मोर्चा शहरातील मुख्य रस्ता, हायवे असा होत भद्रावती तहसील कार्यालयावर धडकला. निप्पान प्रकल्पासाठी संपादित करण्यात आलेल्या ढोरवासा परिसरातील जमिनीवर येऊ घातलेल्या ग्रेटा कंपनीसाठी शासनातर्फे प्रकल्पग्रस्तांच्या समस्या व मागण्या मार्गी न लावता काम सुरू करण्यात आले आहे. जोपर्यंत प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या पूर्ण करण्यात येत नाही तोपर्यंत सदर काम बंद ठेवावे अशी प्रकल्पग्रस्तांची भूमिका आहे. मात्र प्रकल्पग्रस्तांना विश्वासात न घेता सदर कंपनीचे काम सुरू करण्यात आल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये शासन विरोधात रोष व्यक्त करण्यात येत आहे. त्याचीच परिणीती म्हणून निप्पान प्रकल्पग्रस्त समितीतर्फे मोर्चाचे आयोजन करण्यात आले. सदर मोर्चात लिमेश माणूसमारे, सुधीर सातपुते, सुरेश बदखल, बापूराव सोयाम, तेजकरण बदखल, मधुकर सावणकर, अनुप खुटेमाटे, चेतन गुंडावार, प्रवीण सातपुते आदिंसह अनेक महिला तथा पुरुष प्रकल्पग्रस्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.दरम्यान प्रकल्पग्रस्तांच्या या मोर्चाला व मागण्यांना शिवसेना शिंदे गट, तालुका सरपंच संघटन व कैम्युनिष्ट पक्षातर्फे समर्थन देण्यात आले आहे.

## गडसंवर्धनासाठी ठोस पावले उचण्याचा संकल्प

### दिल्ली येथे छत्रपती शिवरायांना अभिवादन

**नवी दिल्ली । सुयश नरसाळे**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या गडकोटांचे संरक्षण आणि जतन करण्यासाठी आवष्यक उपाय योजनांवर व्यापक चर्चा करत गडसंवर्धनासाठी ठोस पावले उचलण्याचा संकल्प करण्यात आल्याचे खा. नीलेश लंके यांनी सांगितले.

नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या तिथीनुसार जयंतीनिमित्त खा. नीलेश लंके यांच्यासह महाराष्ट्रातील खा. वर्षा गायकवाड, खा.भास्कर भगरे, खा. प्रतिभा धानोरकर, खा. नरेश म्हस्के, खा. बळवंत वानखेडे आदींनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, नीलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने



शिवनेरीपासून सुरू करण्यात आलेल्या गडकोट आणि दुर्गसंवर्धन अभियानासंदर्भात महाराष्ट्रातील खासदारांसमवेत चर्चा करण्यात आली. त्यावेळी गडकोट संवर्धनासाठी ठोस पावले उचलण्याचा संकल्प करण्यात आला. महाराष्ट्राच्या गडकोटांवर छत्रपती शिवरायांच्या जयजयकाराचा जसा गगनभेदी जयघोष होतो,तसाच दिल्लीच्या महाराष्ट्र सदनातही जय भवानी, जय शिवाजीचा निनाद झाल्याचे सांगत यावेळी खा. लंके म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून संपूर्ण देशासाठी प्रेरणादायी आहेत. त्यांचे ध्येय, पराक्रमी प्रशासन आणि हिंदवी स्वराज्य स्थापनेची दुरदृष्टी ही आजही मार्गदर्शक असल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

## पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते बोरगाव मेघे येथील बचतगट भवनाचे लोकार्पण





**बोरगाव मेघे । प्रतिनिधी**

ग्रामिण जीवनोन्नती अभियानांतर्गत बोरगाव मेघे येथील सुयोग्य प्रभाग संघ कार्यालयाच्या अंतर्गत २१ लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या बचतगट भवनाचे लोकार्पण आज राज्याचे गृह निर्माण, गृह (ग्रामीण), जालने शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते संपन्न झाले.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्षा वैशाली येरावार उपस्थित होत्या. जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरज गोहाड यांच्यासह स्थानिक अधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.या भवनाच्या माध्यमातून महिलांच्या स्वयंसहाय्यता बचतगटांना भक्कम आधार मिळणार असून, ग्रामीण विकासाला गती मिळणार आहे, असे मत पालकमंत्री डॉ. भोयर यांनी व्यक्त केले. त्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा प्रकारच्या उपक्रमांना शासन स्तरावरून सर्वतोपरी सहकार्य दिले जाईल, असे आश्वासन दिले.

# मृत्यूनंतरही अमर

## वैभवच्या अवयवदानाने मिळाले नवजीवन!

### त्यागाने अंधारात उजेड, अनेकांना जीवनदान

**गणेश वाघ । पारनेर**

पोखरी येथील तरुण अभियंता वैभव सोपान खैरे यांच्या अचानक झालेल्या दुर्दैवी मृत्यूने संपूर्ण कुटुंबाला हादरवून टाकले, पण त्यांच्या अवयवदानाच्या महान निर्णयाने अनेकांना नवजीवन मिळाले. सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या वैभवने अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून पुण्यात नोकरी मिळवली आणि कुटुंबाचा आधार बनला.७ मार्च रोजी वैभवला अचानक स्ट्रोक आला. कुटुंबीयांनी तातडीने त्याला रुग्णालयात दाखल केले, मात्र त्याच्या प्रकृतीत सुधारणा झाली नाही. डॉक्टरांनी त्याला ब्रेन डेड घोषित केले. ही बातमी कुटुंबावर प्रचंड मानसिक आघात करणारी होती. एकुलता एक मुलगा, कुटुंबाचा आधार हिरावल्याची भावना असतानाही खैरे कुटुंबीयांनी एक आदर्श निर्णय घेतला - अवयवदानाचा! वैभवच्या हृदयाची धडधड कुणाच्या तरी छातीत कायम राहील, त्याच्या डोळ्यांमुळे कुणाला नवी दृष्टी मिळेल, आणि तो कुणाच्या तरी जीवनाचा आधार बनेल.वैभवच्या हृदय, यकृत, मूत्रपिंड, फुफ्फुसे आणि नेत्रदानामुळे पाच ते सहा जणांना नवजीवन मिळाले. विशेषतः त्याच्या हृदयाचे यशस्वी प्रत्यारोपण झाल्याने एका रुग्णाला जीवनदान मिळाले.त्याच्या डोळ्यांच्या प्रत्यारोपणाने दोन जणांना नवा प्रकाश मिळाला. वैभवच्या बलिदानामुळे अनेक कुटुंबांमध्ये आनंद पसरला, जिथे मृत्यूची छाया होती, तिथे नव्या आयुष्याची पहाट झाली.पोखरी गाव डोंगराळ भागात असल्याने वाहतुकीच्या मर्यादा होत्या, तरीही वैभवने अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले. त्याच्या मेहनतीमुळे संपूर्ण कुटुंबाला आधार मिळाला.वैभवच्या विवाहासाठी वधू शोधण्याची चर्चा सुरू होती, कुटुंबाला त्याच्या लग्नाचे वेध लागले होते. मात्र नियतीने आनंदाऐवजी दुःखाची शिदोरी पाठवली.त्याच्या निधनाने संपूर्ण गाव शोकसागरात बुडाला. गावातील प्रत्येकाने या तरुणाच्या अपघाती मृत्यूचे दुःख व्यक्त केले. मात्र त्याच्या अवयवदानामुळे तो मृत्यूनंतरही अमर झाला.वैभवच्या आई-वडिलांनी घेतलेला अवयवदानाचा निर्णय हे एक धाडसाचे पाऊल ठरले. मृत्यूच्या वेदनेतूनही त्यांनी इतरांना जीवनदान देण्याचा विचार केला.डॉक्टर, मित्र, कुटुंबीय आणि वैद्यकीय पथकाचे विशेष आभार मानले गेले. वैभवच्या आई-वडिलांनी हा निर्णय इतरांसाठी प्रेरणादायी ठरेल अशी आशा व्यक्त केली.वैभवच्या कुटुंबीयांनी त्याच्या स्मरणार्थ अवयवदान चळवळीला चालना देण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. त्यांनी इतरांना या महान कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.त्याच्या बलिदानामुळे अवयवदानाचे महत्व अधोरेखित झाले आहे. वैभव खैरे फक्त एका कुटुंबाचा आधार नव्हता, तर तो आता अनेकांसाठी जीवनाचा नवा प्रकाश बनला आहे!



## शिवरायांना अभिवादनासाठी प्रचंड जनसमुदाय उसळला

### शिवगर्जनेने गंगाखेड दणाणले!



**गंगाखेड । प्रतिनिधी**

मराठी तिथीनुसार शिवसेनेच्या वतीने उपजिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे यांच्या आयोजनातून शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसरात सकाळी ११ वाजता महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, जिजाऊ वंदना व महाआरती करण्यात आली. शिवरायांना अभिवादन करण्यासाठी दिवसभर मोठ्या प्रमाणात शिवभक्त उपस्थित होते.शिवजयंतीनिमित्त नरेंद्र माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी शिवजन्मोत्सव पाळणा गीत सादर केले, तर नादब्रह्म संगीत विद्यालयाचे प्रा. डॉ. सचिन पवार यांनी 'एकच राजा' पोवाड्याच्या माध्यमातून शिवरायांचा इतिहास उलगडला. योग प्रशिक्षक प्रकाश डिकले यांनी जिजाऊ वंदना आणि महाआरती घेतली. जय भवानी, जय शिवाजी! अशा घोषणांनी संपूर्ण गंगाखेड दणाणून गेले.

या सोहळ्याला शिक्षक सेनेचे मराठवाडा कार्याध्यक्ष तथा नगरसेवक बाळासाहेब राखे, शिवस्मारक समितीचे समन्वयक गिरीश सोळंके, युवा नेते सुशांत चौधरी, ओबीसी संघटनेचे प्रमुख गोविंद यादव, माजी नगरसेवक धम्मानंद घोबाळे, तुकाराम तांदळे, रणधीर राजे भालेराव, बाळासाहेब शिंदे, संदीप तापडिया, डॉ. गोविंद मुळे, प्राचार्य मुंजाजी चोरघडे, माजी सैनिक संघटनेचे उपाध्यक्ष प्रल्हाद मुंडे, इंजिनीयर रामभाऊ मुरकुटे, गजानन कुलकर्णी, माजी सरपंच भगीरथ फड, अमोल दिवान, जगन्नाथ आंधळे, पत्रकार अजित गणाचार्य, अक्षय मुंडे, संजय सुपेकर, नागेश केरकर आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख विष्णू मुरकुटे, सिद्धेश्वर आंधळे, जितेश गोरे, नागेश कोनाडे, राजेश सगट, बाळू साळवे, योगेश मुरकुटे, अक्षय आंधळे आदींनी परिश्रम घेतले. या सोहळ्याने गंगाखेडमध्ये शिवभक्तीचे आणि राष्ट्रभक्तीचे वातावरण निर्माण केले.

## वरोरा येथे उपवधू-वर परिचय मेळावा

# हजारो आदिवासी बांधवांच्या उपस्थितीत पालकमंत्री अशोक उईके यांचा जाहीर सत्कार









**वरोरा (प्रतिनिधी)-क्रांतिवीर शहीद बाबुराव पुल्लेश्वर शेडमाके यांच्या जयंती निमित्य आदिवासी समाजाच्या विवाह जुळणीसाठी आयोजित उपवधू-वर परिचय मेळावा भव्य उत्साहात पार पडला. या सोहळ्यात विदर्भातील ४०० हून अधिक उपवधू-वरांनी नावनोंदणी करून आपला परिचय दिला.यावेळी आदिवासी समाजाच्या विकासासाठी सातत्याने कार्यरत असलेल्या पालकमंत्री अशोक उईके यांचा हजारो आदिवासी बांधवांच्या उपस्थितीत जाहीर सत्कार करण्यात आला. समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी घेतलेल्या पुढाकारांबद्दल आदिवासी बांधवांनी कृतज्ञता व्यक्त केली.**



आदिवासी समाजाच्या विविध मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत पालकमंत्री तथा आदिवासी विकास मंत्री प्रा. अशोक उईके यांनी आठवड्यातून दोन दिवस आदिवासी प्रकल्प कार्यालय वरोरा येथे कार्यरत राहणार असल्याची मोठी घोषणा केली. तसेच समाजासाठी भव्य समाजभवन उभारण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. शनिवारी १५ मार्च रोजी सिद्धिविनायक मंगल कार्यालय, वरोरा येथे आदिवासी उपवधू-वर परिचय मेळावा, नामदार प्रा. अशोक उईके यांचा जाहीर सत्कार समारंभ आणि गोंडी ढेमसा नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पालकमंत्री अशोक उईके यांच्या प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाचा भव्यदिव्य प्रारंभ झाला. या वेळी आदिवासी नेते रमेश मेश्राम यांनी समाजाच्या मागण्यांची ठामपणे मांडणी केली.

आदिवासी समाजाच्या हक्कांसाठी संघर्षशील राहण्याची भूमिका घेतलेल्या मेश्राम यांच्या मागणीला अखेर यश आले, आणि पालकमंत्र्यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले. शासन स्तरावर आदिवासी समाजाच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. त्यांच्या मागण्यांची अंमलबजावणी हीच खरी प्रगती आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री अशोक उईके यांनी केले. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी अधिक शैक्षणिक सुविधा, रोजगारनिर्मिती आणि सांस्कृतिक जतनासाठी विशेष योजना राबवणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या वेळी आदिवासी नेते रमेश मेश्राम यांनी ५१ जोडप्यांचा सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला. त्यांच्या या संकल्पनेला दुजोरा देत पालकमंत्री अशोक उईके यांनी १०१ जोडप्यांचा भव्य आदिवासी समाज सामूहिक विवाह सोहळा आयोजित करण्याचे आश्वासन दिले. तुम्ही नियोजन करा, मी संपूर्णपणे तुमच्या पाठीशी आहे, असे ठाम शब्द त्यांनी दिले. या कार्यक्रमात पालकमंत्री अशोक उईके उद्घाटक, तर आदिवासी नेते रमेश मेश्राम अध्यक्षस्थानी होते. आमदार करण देवतळे स्वागताध्यक्ष, तर आमदार राजू तोडसाम विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्त्या प्रिया राजू तोडसाम, उपविभागीय अधिकारी झेनिथ चंद्रा, सामाजिक कार्यकर्ते आशिष मशीरकर,ट्रायबल इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीजचे भोला मडावी, शिवसेना लोकसभा संघटक मुकेश जिवतोडे, माजी नगराध्यक्ष गजानन मेश्राम, सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक बी. डी. मडावी, डॉ. देव किन्नाके, जितेश कुळमेथे, प्रमोद बोरीकर, प्रकल्प अधिकारी प्रवीण लाटकर, तहसीलदार योगेश कौटकर, पोलीस निरीक्षक अजिंक्य तांबोळे, माजी जिल्हा परिषद सदस्य कुसुम अलाम, डॉ. प्रवीण येरमे आणि डॉ. शारदा प्रवीण येरमे आदी मान्यवर उपस्थित होते. हजारो आदिवासी समाज बांधवांच्या उपस्थितीत पालकमंत्री अशोक उईके यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. तसेच आदिवासी नेते रमेश मेश्राम यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत पालकमंत्र्यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले आणि समाजाने त्यांच्या नेतृत्वाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमात गोंडी ढेमसा नृत्य स्पर्धेमध्ये आदिवासी तरुण-तरुणींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. पारंपरिक वेशभूषा, आकर्षक नृत्य आणि वाद्यांच्या गजरात आदिवासी संस्कृतीचे मनमोहक दर्शन घडले. समाजाच्या हक्कांसाठी लढणाऱ्या नेत्यांनी या स्पर्धेच्या निमित्ताने एकजुटीचे प्रतीक निर्माण केले आणि आदिवासी संस्कृतीच्या उज्ज्वल भविष्यासाठी पुढाकार घेतला. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून तेलंगणातील प्रसिद्ध गोंडी गायक 'सुपर स्टार' रवी मेश्राम यांनी काम पाहिले. आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असून, त्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी वेळ आणि निधी कमी पडू देणार नाही, असा ठाम विश्वास पालकमंत्री अशोक उईके यांनी व्यक्त केला. त्यांच्या या भूमिकेमुळे आदिवासी समाजात नव्या आशा निर्माण झाल्या आहेत. कार्यक्रमाचे स्वागतगीत 'पहांदी कुपार लिंगो' गोंडी भजन मंडळ, माढेळी यांनी सादर केले.कार्यक्रमाचे संचालन विनोद आत्राम आणि गणपत येटे यांनी केले.प्रास्ताविक अविनाश पंधरे, तर आभार अनिल कुमरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संभा मेश्राम, ज्ञानेश्वर चांदेकर, आनंद येटे, अनिल कुमरे, मनोज पेंदोर, संदीप कोरांगे, उद्धव गेडाम, शुभम येटे, दर्शन गेडाम, सुखदेव मेश्राम, दिलीप येटे, स्वप्नील येटे, पवन मेश्राम, प्रभाकर पेंदोर, जितू कुळसंगे, संजय मेश्राम, दिगंबर कुळसंगे, पुष्पा मंगाम, वनिता परचाके, नीता कुळसंगे, प्रतिभा अनिल कुमरे, निर्मला मेश्राम, भारती मडावी, विद्या किन्नाके, वृषाली आडे, जयश्री मेश्राम यांनी अथक परिश्रम घेतले.

## एस.एस.एन.जे.महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा

**देवळी । प्रतिनिधी**



स्थानिक एस. एस. एन. जे. महाविद्यालय, देवळी येथे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनीता सोनारे होत्या. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. नरेंद्र डेबे यांची उपस्थिती होती, तर सांस्कृतिक समितीचे सचिव डॉ. प्रभाकर ढाले यांचीही उपस्थिती होती. या कार्यक्रमात बोलताना प्राचार्या डॉ. सुनीता सोनारे म्हणाल्या, भाषा कोणतीही असो, ती जिवंत असणे गरजेचे आहे. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला असून ती अधिक समृद्ध करण्याची जबाबदारी आपली आहे. प्रमुख वक्ते प्रा. नरेंद्र डेबे यांनी मराठी भाषेच्या इतिहासाचा आढावा घेत विद्यार्थ्यांना भाषेचे महत्त्व पटवून दिले. ते म्हणाले, मराठी भाषेचा प्रसार आणि जतन करण्याचे कार्य अनेक साहित्यिकांनी केले आहे. कुसुमाग्रज यांनी आपल्या साहित्याद्वारे मराठीला मोठे योगदान दिले आहे. मराठी संवाद साधताना इंग्रजी शब्दप्रचलनावर त्यांनी चिंता व्यक्त केली. मराठी भाषेला पर्यायी शब्द निर्माण करून आपण इंग्रजी शब्दांचे प्रमाण कमी केले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रभाकर ढाले यांनी केले. ते म्हणाले, मराठी भाषा टिकवणे आणि मराठी शाळांना बळकट करणे ही आपली जबाबदारी आहे. कार्यक्रमाचे संचालन कु. नेहा घोडे हिने केले तर आभार प्रदर्शन कु. गायत्री सातपुते हिने मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी आणि विद्यार्थिनींची मोठी उपस्थिती होती.

## गुहा येथे १८ ते २० मार्च दरम्यान कानिफनाथ महाराज यात्रा उत्सव

**गुहा । प्रतिनिधी**





राहुरी तालुक्यातील गुहा येथे कानिफनाथ महाराज यात्रा उत्सव १८ ते २० मार्च दरम्यान संपन्न होणार आहे. यात्रेच्या अध्यक्षपदी अतुल दत्तात्रय कोळसे, उपाध्यक्षपदी रवींद्र बाळासाहेब डौले, तर खजिनदारपदी अनिल सौदागर यांची निवड करण्यात आली आहे.यात्रेची सुरुवात मंगळवारी (१८ मार्च) मानाचा नैवेद्य व काठी मिरवणुकीने होईल. बुधवारी (१९ मार्च) सकाळी होम-हवन, गंगाजल पूजन व कावड मिरवणूक, दुपारी महाआरती, तर रात्री सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. गुरुवारी (२० मार्च) दुपारी महंत रामगिरी महाराज यांचे प्रवचन, संध्याकाळी भव्य कुस्ती स्पर्धा, तर रात्री नाथ भक्त आकाश शिंदे यांचा नाथ संगीत कार्यक्रम रंगणार आहे.

भाविकांसाठी दर्शन रांगेची सोय, पार्किंग, पिण्याच्या पाण्याची सुविधा आणि आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. विविध प्रकारच्या दुकानांमध्ये फुलहार, खेळणी, खाद्यपदार्थ, सौंदर्य प्रसाधने व गृहउपयोगी वस्तू उपलब्ध असतील.शुक्रवारी (१४ मार्च) श्रीफळ वाढवून यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी सुजित वाबळे, अविनाश ओहोळ, नंदू सौदागर, नानासाहेब चंद्रे, शरद कोळसे, शिवाजी मांजरे, शरद वाबळे, राम बर्डे, विजय वाबळे, चंद्रकांत थोरात, लहानु कोळसे, दत्तात्रय शिंदे, हरी आंबेकर, अनिकेत गांगुर्डे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.भाविकांनी यात्रा उत्सवातील कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन कानिफनाथ देवस्थान विश्वस्त कमिटी, यात्रा कमिटी व ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे.

## निमसाखर येथे २२ मार्चपासून पिरसाहेब उरूस यात्रा उत्सव

**इंदापूर । प्रतिनिधी**



निमसाखर (ता. इंदापूर) येथे पिरसाहेब उरूस यात्रेची तयारी जोरदार सुरू झाली आहे. परंपरेनुसार ही यात्रा शनिवार, २२ मार्चपासून सुरू होणार आहे. या निमित्ताने निमसाखर आणि पंचक्रोशीतील हजारो भाविक दर्शनासाठी उपस्थित राहणार आहेत.शनिवारी (२२ मार्च) संदल मिरवणूक आणि गलप चढवणे होणार आहे. रविवारी (२३ मार्च) यात्रेचा मुख्य दिवस असून सायंकाळी ९ वाजता आनंद महाजन (जळगावकर) यांचा लोकनाट्य तमाशा आणि मनोरंजनाचा कार्यक्रम होणार आहे. सोमवारी (२४ मार्च) महिलांसाठी दर्शन विशेष दिवस असेल.

यात्रेच्या सुरळीत आयोजनासाठी ग्रामपंचायत, महावितरण (चडएइ), आरोग्य विभाग आणि पोलीस प्रशासनाचे विशेष सहकार्य मिळत आहे.यात्रा उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष संतोष जयकुमार रणवरे पाटील, सरपंच धैर्यशील विजयकुमार रणवरे पाटील, सुनील (नाना) रणवरे, गजानन रणवरे, राजेंद्र रणवरे, धनंजय रणवरे, धीरज रणवरे पाटील, अजित (दादा) रणवरे, सिद्धार्थ रणसिंग, अजिंक्य आनंदराव रणवरे पाटील, नंदकुमार चव्हाण, निखिल अडसूळ, खुदा भाई मुलानी, लतीफ भाई मुलानी आणि रशीद (बाळू भाई) मुलानी यांचे विशेष योगदान आहे.भाविकांनी या धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा कमिटी आणि निमसाखर ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे.

## महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम तर संपूर्ण कुटुंब सक्षम-पोलीस उपनिरीक्षक राऊत



**उमरखेड । प्रतिनिधी**

महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्यास संपूर्ण कुटुंब आर्थिक संपन्न होते. महिलांनी मागणी असलेल्या वस्तूंचे उत्पादन करून उद्योग उभारावेत, असा सल्ला पोलीस उपनिरीक्षक सारिका राऊत यांनी दिला.चातारी येथे स्मृतिशेष दिगंबरराव पसलवाड सेवाभावी संस्थेच्या वतीने आयोजित महिला मार्गदर्शन व गुणवंत सन्मान सोहळ्यात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले व माता रमाई यांच्या प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.

महिलांनी घरगुती उद्योग सुरू करताना घाबरू नये, तसेच बँकेचे सिबिल चांगले ठेवावे, म्हणजे कर्ज मिळणे सोपे होते, असे मार्गदर्शन त्यांनी केले. मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेताना व्याजदर तपासण्याचा सल्ला त्यांनी दिला.मोबाईलचा वापर योग्य पद्धतीने झाला पाहिजे. अल्पवयीन मुली मोबाईलच्या आहारी जाऊन पळून जाण्याच्या घटनांत वाढ होत आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.तालुका समन्वयक (आर्थिक समावेशन) मिना मस्के यांनी महिलांनी स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून उद्योग सुरू करावेत आणि उत्पादनाच्या विक्रीची चिंता न करता मार्गदर्शन घ्यावे, असे सांगितले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनुराधा आशिष हामंद होत्या. प्रास्ताविक पूजा दिगंबर माने यांनी केले. सूत्रसंचालन चंद्रकांत पवार, तर आभार शिवाजी माने यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अशोक झेलबा माने, गजानन प्रभाकर माने, अंकुश धात्रक यांनी विशेष मेहनत घेतली.

## पारधी समाजाचे १२ घरे वन विभागाने जेसीबीच्या साह्याने पाडून त्यांना आग लावली

**बीड (प्रतिनिधी):** झापेवाडी तालुका शिरूर जिल्हा बीड येथील पारधी वस्तीवर झालेल्या हल्ला व त्या हल्ल्यांमध्ये अनेक जणांना रुग्णालयात दाखल करावे लागले आहे या घटनेचा निषेध करावा तेवढे कमीच आहे महाराष्ट्रामध्ये दलित, आदिवासी, ओबीसी समाज सुरक्षित आहे का या समाजाला आपापसात भांडण करायला लावून त्याचा फायदा अनेक उच्चवर्णीय नेतेमंडळी बीड जिल्ह्यात घेताना दिसत आहेत परंतु बीड जिल्ह्यामध्ये एक आगळे वेगळे वातावरण निर्माण झाले आहे या वातावरणामुळे गुना गोविंदाने नांदणारे समाज आता एकमेकांकडे शंकेच्या नजरेने पाहत आहेत याचाही विचार शासनाने करणे गरजेचे आहे बीड जिल्हा सध्या पूर्ण महाराष्ट्रात गाजत चालला आहे याचा परिणाम स्पष्टपणे जिल्ह्यात दिसून येत आहे याचे मुख्य कारण म्हणजे रक्तरंजित राजकारण याला फक्त आणि फक्त संविधानिक पदावर म्हणजेच निवडून आलेले व्यक्ती कारणीभूत आहेत अशी चर्चा आता बीड जिल्ह्यामध्ये रंगू लागली आहे याचा आम्ही लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने जाहीर निषेध करत आहोत झापेवाडी तालुका शिरूर जिल्हा बीड येथे भेट दिली असता समवेत भीमशक्तीचे बीड जिल्हा कार्याध्यक्ष भीमराव सरवदे लोक जनशक्ती पार्टीचे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहुळे कॉम्रेड बब्रुवान पोटभरे धीमंत राष्ट्रपाल सुमित आवाडे व इतर.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .